# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

WeWite: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक | सह संपादक:- सौ अश्विनी नाईक-परब


PG 2 प्लास्टिक पिशव्यांचे पुन्हा पीक!

3 → घाईचा रथ, अविचारांचे घोडे

१५० रेल्वेचे तिकिट खासगी कंपन्या ठरवणार ← 4




# दिल्ली आपचीच

## केजरीवाल पुन्हा पडणार भाजपाला भारी

### ७० जागांसाठी ८ फेब्रुवारीला मतदान; ११ फेब्रुवारीला निकाल

**नवी दिल्ली - निवडणूक आयोगाने दिल्ली विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहिर केल्या आहेत. दिल्लीमध्ये ८ फेब्रुवारी २०२०मध्ये निवडणूका होणार असून ११ फेब्रुवारी रोजी निवडणुकांचे निकाल जाहिर करण्यात येतील. सोमवारी दुपारी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेमध्ये निवडणूक आयोगाने दिल्ली विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. मुख्य निवडणुक आयुक्त सुनील अरोरा यांनी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. तसेच या निवडणुकीत १ कोटी ४६ लाख मतदार मतदान करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.**



विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर आता दिल्लीतील जनतेचा संभाव्य कल सांगणारे ओपिनियन पोल प्रसिद्ध होऊ लागले आहेत. दरम्यान, काही वृत्तवाहिन्यांनी सोमवारी प्रसिद्ध केलेल्या ओपिनियन पोलमधून दिल्लीमध्ये आपचीची सत्ता कायम राहणार असल्याचा कल दर्शवला आहे. दिल्लीमध्ये मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पक्ष पुन्हा एकदा मोठ्या बहुमतासह विजयी होणार असून, भाजपा आणि काँग्रेसला दोन आकडी जागाही जिंकता येणार नाहीत, असा अंदाज या ओपिनियन पोलमधून वर्तवण्यात आला आहे.


ओपिनियन पोलमध्ये वर्तवलेल्या अंदाजानुसार भाजपाल ५९ जागा मिळतील. तर अरविंद केजरीवाल यांच्यासमोर मोठे आव्हान उभे करण्याच्या प्रयत्नात उर्वरित पृष्ठ 2 वर

### २०१५ विधानसभा निवडणुकांचे निकाल

२०१५मध्ये पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पार्टीला बहुमत मिळालं होतं. आम आदमी पार्टीने ६७ जागांवर विजय मिळवला होता. तीन जागा भाजपच्या खात्यात गेल्या होत्या. काँग्रेसला मात्र एकाही जागेवर विजय मिळवता आला नव्हता. दिल्लीत विधानसभेच्या एकूण ७० जागा आहेत.

### २०१५मध्ये मिळालेल्या मतांचं प्रमाण

२०१५मध्ये विधानसभा निवडणुकांमध्ये आम आदमी पार्टिने ७० जागांवर आपले उमेदवार उभे केले होते. निवडणुकांच्या निकालामध्ये आम आदमी पार्टिला एकूण ५४.३४ टक्के मतं मिळाली होती. भाजपने ६९ जागा या निवडणुकीत लढवल्या असून त्यांना ३२.१९ टक्के मतं मिळाली होती. तसेच काँग्रेसने ७० जागांवर आपले उमेदवार उभे केले असून ९.६५ टक्के मतं मिळाली होती.



# गुन्हेगारी क्षेत्रात पालघर जिल्हा अग्रेसर पोलिसांनी केले गुन्हेगारांचा पर्दाफाश

## जनसामान्या पालघर पोलिसांचे कौतुक व व अभिनंदनाचा वर्षाव

*पालघर जिल्हा पोलीस दलाकडून १ जानेवारी २०१९ ते २९ डिसेंबर २०१९ या कालावधीत अवैध धंद्यावर कारवाई करून करोडो रुपयेचा मुद्देमाल जप्त*

**रेती**

अवैध रेती वाहतूक/ उत्खनन केलेबाबत ११२ गुन्हे दाखल करण्यात आले असुन चोरलेली रेती व वाहने असा १४,६१,५५,७५८/- रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करून २६३ आरोपीत यांचेवर कारवाई करण्यात आली आहे.

**गुटखा वाहतूक**

गुटखा वाहतूक/विक्री करणे अंतर्गत १२१ गुन्हे दाखल करण्यात आले असुन आरोपीत यांचेकडून १२,८८,३२,४५३/- रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करून १८२ आरोपीत यांचेवर कारवाई करण्यात आली आहे.

**दारू**

अवैध दारू विक्री/वाहतूक केलेबाबत दारूबंदी कायद्यानुसार ६७३ गुन्हे दाखल करण्यात आले असुन अवैध दारू व वाहने असा



२,४९,७१,०४९/- रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करून ६८९ आरोपीत यांचे वर कारवाई करण्यात आली आहे.

**जुगार/मटका**

मुंबई जुगार कायद्या अंतर्गत केलेबाबत ७७ गुन्हे दाखल करण्यात आले असुन आरोपीत यांचेकडून ५८,२५,३८२/- रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करून ४३६ आरोपीत यांचेवर कारवाई करण्यात आली आहे.

**अंमली पदार्थ**

एन. डी.पी.एस. कायद्यानुसार ८५ गुन्हे दाखल करण्यात आले असुन आरोपीची संख्या ११८ आहे त्यामध्ये १९,६८,२३,९९९/- रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**पिटा कायद्यानुसार केलेली कारवाई**

पिटा कायद्यानुसार १८ गुन्हे दाखल करण्यात आले असून ३६ आरोपीत यांच्यावर कारवाई करण्यात आली असुन आरोपीत यांच्या ताब्यातून १,१७,७४०/- रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**आर्म अॅक्टनुसार केलेली कारवाई**

आर्म अॅक्ट नुसार १३ गुन्हे दाखल करण्यात आले असुन एकुण ६२,६३३८५/- रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करून २९ आरोपीत यांना अटक करण्यात आली आहे.

# जेएनयूमधील हिंसाचार पाहून २६/११ मुंबई हल्ल्याची आठवण झाली - उद्धव ठाकरे



**जवाहरलाल नेहरु विद्यापीठात (जेएनयू) झालेला हिंसाचार पाहून मला २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्याची आठवण झाली असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिली आहे. तोंड झाकून हल्ला करणाऱ्यांचा खरा चेहरा समोर आला पाहिजे असं सांगताना हल्लेखोरांचा शोध घेऊन कारवाई करणं गरजेचं असल्याचं म्हटलं आहे. यावेळी त्यांनी गरज लागल्यास महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांची सुरक्षा वाढवली जाईल असं आश्वासन दिलं.**

पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे की, 'हे बुरखाधारी डरपोक होते. जर धाडस होतं तर तोंडावर मुखवटा का लावला होता ? त्यांचा शोध घेऊन कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे. या हिंसाचाराचं कधीच समर्थन होऊ शकत नाही. हा हल्ला पाहिल्यानंतर मला २६ नोव्हेंबरच्या दहशतवादी हल्ल्याची आठवण झाली'. उद्धव ठाकरे यांनी यावेळी महाराष्ट्रात असा हल्ला खपवून घेतला नसता सांगत अशी कोणतीही गोष्ट महाराष्ट्रात होऊ देणार नाही असं आश्वासन दिलं. उद्धव ठाकरे यांनी अमित शाह यांचं नाव घेण्याचं उर्वरित पृष्ठ 2 वर

# ऑस्ट्रेलियातील आगीत अनेक संसार उध्वस्त

## आगीत ४८०,०००,००० वन्यजीवांचा जळून मृत्यू



उर्वरित पृष्ठ 2 वर

# आपले शहर स्वच्छ-सुंदर मीरा-भाईंदर



नवघर रोड, भाईंदर स्टेशन जवळील परिसराची दुरावस्था

# पनवेल शहरात सोशल राईट्स फाऊंडेशनच्या वतीने प्रत्येकशाळेत स्वच्छता मोहिम व मार्गदर्शन सप्ताह अयोजित करण्यात आला






दिनांक ३ ।०१।२०२० रोजी सोशल राईट्स फाऊंडेशनचे संस्थापक दिपक मोरेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाने पनवेल शहर अध्यक्ष राहूल लोहकरे व सर्व पदाधिकारी यांनी ठिकठिकाणी शाळेत जाऊन शौचालय व प्रसाधनगृहाची पाहणी केली असता अतिशय गंभीर असे चित्र डोळयासमोर आले. सदर प्रसंगी शाळेच्या प्रशासनाशी या विषयावर चर्चा करुन लवकरच तोडमोड झालेल्या संडासच्या भांडयाचे, मुतारीच्या भांडयाचे दुरुस्तीकरण करु असे आश्वासन देण्यात आले. परंतू एकसमस्या प्रशासनाला नेहमी येते. त्यांच्या म्हणण्यानुसार विद्यार्थी शाळेच्या प्रसाधन गृहात पाण्याचा नळ चालू ठेवणे, तोडफोड करणे वगैरे करतात. यावर सोशल राईट्सच्या पदाधिकाऱ्यांमार्फत आरोग्य विषयक मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात रजनी लोहकरे, संतोष तोत्रे, बाळकृष्ण शिंदे, प्रविण जाधव, अनिकेत मोहिते, आदर्श भागवत, सचिन केकान, सुशील वर्मा, भक्ती हेगडे यांच्यावतीने मार्गदर्शन करण्यात आले व यापुढे शाळेमध्ये मुलांनी स्वच्छता व पाण्याचा विसर्ग होणार नाही याची ग्वाही दिली.

# प्रभाग अध्यक्षानी पकडले भेसळयुक्त अंड्यांचे ट्रक



**मुंबई :** कांदिवली पश्चिमेकडील चारकोप सेक्टर २ मध्ये अंदाजे चार हजार भेसळयुक्त अंड्यांचे दोन ट्रक शिवसैनिकाने काल पकडले. मुंबई महानगरपालिकेच्या आर/मध्य व आर/ उत्तर प्रभाग समिती अध्यक्ष संध्या विपुल दोशी याप्रकरणी कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे. चारकोप पोलीस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा नोंदवला असून सदर दोन्ही टेम्पोना सील ठोकले आहे.दरम्यान येत्या पंधरा दिवसात याबाबत अहवाल सादर केला जाणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. चारकोप सेक्टर २ येथील एकांत सोसायटीत राहणाऱ्या अनुज केशव भुवड उर्वरित पृष्ठ 2 वर

# लवकरच जाहिर होणार म्हाडाच्या कोकण मंडळाची ६,१३६ घरांची लॉटरी

**मुंबई-** म्हाडाच्या कोकण मंडळाची भंडार्ली, माणकोली-भिवंडी, घणसोली, वसई या भागांमधील ६,१३६ घरांचा समावेश असलेली लॉटरीची जाहिरात काढण्यात येणार आहे. यामुळे नव्या वर्षामध्ये घर खरेदीदारांना दिलासा मिळणार आहे. खासगी विकासकाकडून म्हाडाला २० टक्के जी घरे मिळाली आहेत, त्यांची किंमत ठरवण्याचे काम सध्या म्हाडामार्फत सुरू असून, हे काम पूर्ण होताच ही जाहिरात प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे म्हाडातील एका अधिकाऱ्याने सांगितले.जुने वर्ष संपताना आणि नवीन वर्षाच्या सुरुवातीला सामान्यांसाठी प्रत्येक मंडळाकडून किती घरे उपलब्ध होतील, याचा आढावा घेण्यात येतो. मुंबई म्हाडाकडून सामान्यांसाठी २०२० मध्ये फारशी घरे उपलब्ध होणार नसल्याने, मुंबईकरांना २०२२-२३ पर्यंत घरांसाठी वाट पाहावी लागेल. कोकण मंडळाकडून मात्र सर्वसामान्यांसाठी मोठ्या संख्येने घरे उपलब्ध होतील. म्हाडाच्या कोकण मंडळाच्या कल्याण, शिरढोण, खोणी परिसरात परवडणारी घरे घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी मात्र, सुमारे ६,१३६ घरे उपलब्ध होतील, असे म्हाडातील सूत्रांनी दिली.

म्हाडाच्या कल्याणमधील शिरढोण येथे पाच हजार, तर खोणी, भंडार्ली येथे एक हजार १३६ घरांची नवीन वर्षात सोडत काढली जाणार आहे. याशिवाय माणकोली-भिवंडी (२७९), घणसोली (४०), वसई (१५) येथील घरेही उपलब्ध झाली असून, ती सोडतीसाठी उपलब्ध असणार आहेत. सर्वसामान्यांसाठी अधिकाधिक घरे कशी उपलब्ध करून देता येतील, याचा म्हाडा नेहमीच विचार करत असते. २०२० मध्ये सामान्यांसाठी मुंबईत फारशी घरे उपलब्ध नाहीत.



# ‘शेतकऱ्यांना कर्जमुक्ती सन्मानाने द्या’

**मुंबई :** शेतकऱ्यांना कर्जमुक्त करताना कुठलीही अट नको. त्यांना रांगेत उभे राहण्याची आवश्यकता नाही. सन्मानाने कर्जमुक्तीचा लाभ मिळावा यासाठी महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना आखली आहे. योजना राबविताना शेतकऱ्यांना आपुलकीची वागणूक द्या. त्याचवेळी या योजनेचा गैरफायदा घेण्यासाठी बँकानी चुकीची यादी दिल्याचे निदर्शनास आल्यास सबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करा, असे स्पष्ट आदेश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. त्याचप्रमाणे या योजनेचा लाभ शेतकऱ्यांना लवकर मिळावा यासाठी पात्र शेतकऱ्यांच्या याद्या सोमवापर्यंत बँकानी द्याव्यात, असे



निर्देशही मुख्यमंत्र्यांनी बँकाना दिले. शेतकऱ्याला आपण काही देतोय या भावनेपेक्षा शेतकऱ्यांचे आशीर्वाद आपण घेतोय या भावनेपोटी कर्जमुक्तीची योजना राबविली जात आहे. जिल्हास्तरीय यंत्रणांनी ही भावना लक्षात घेऊन योजनेची अंमलबजावणी करावी, असे स्पष्ट करतानाच दिलेल्या वेळापत्रकानुसार ही योजना पूर्ण करा.आधार प्रमाणिकरणासाठी इंटरनेटची आवश्यकता असून दुर्गम भागात इंटरनेट सुविधा नाही अशा गावातील शेतकऱ्यांना नजिकच्या गावात नेऊन तेथील आपले सरकार केंद्रावर आधार प्रमाणिकरण आणि अन्य बाबी पूर्ण कराव्यात. अशावेळी शेतकऱ्यांची ने-आण केल्यास त्यांना हेलपाटे मारावे लागणार नाही. त्यासाठी बसची व्यवस्था करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

# साखर कारखान्यांमधील नोकरभरतीवर सरकारची बंदी

**मुंबई- राज्यातील सर्व सहकारी साखर कारखान्यांमधील नोकरभरतीवर राज्य सरकारने बंदी घातली आहे. मनमानी नोकरभरती आणि त्यांच्या वेतनावर होणारा वारेमाप खर्च कमी करण्यासाठी राज्य सरकारने हा निर्णय घेतला आहे. प्रत्येक कारखान्यांचा कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध तयार झाल्यानंतरच नोकरभरतीला परवानगी दिली जाणार आहे. राज्याच्या सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने शुक्रवारी तसा आदेश काढला.**

सहकार विभागातील सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार राज्यातील बहुतांश साखर कारखाने हे आर्थिकदृष्ट्या अडचणीत आहेत. त्यात आवश्यकतेपेक्षा जास्त कर्मचारी असल्याने त्यांच्या वेतनावरही वारेमाप खर्च केला जातो. परिमाणी ऊसउत्पादक



शेतकऱ्यांना एफआरपीची रक्कम वेळेवर मिळत नाही. कारखान्यांच्या उत्पन्नातील मोठा वाटा प्रशासनावर खर्च होत आहे. त्यामुळे कारखाने आणखी डबघाईला जात आहेत. नजीकच्या काळात काही साखर कारखान्यांच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे प्रशासनावरील खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक झाले आहे.

त्यादृष्टीने सहकारी साखर कारखान्यांमध्ये भागभांडवल असलेल्या राज्य सरकारने आर्थिक उधळपट्टीला आळा घालण्यासाठी काही ठोस पावले टाकण्याचे ठरविले आहे.

या संदर्भात राज्य सरकारने २०१५ मध्ये साखर संचालक (प्रशासन) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति स्थापन केली होती. समितीने राज्य सरकारला सादर केलेल्या अहवालात प्रत्येक कारखान्यांमध्ये किती अधिकारी आणि कर्मचारी असावेत याचा आकृतिबंध तयार केला जावा, अशी शिफारस केली आहे. त्यानुसार सर्व साखर कारखान्यांना त्यांचा त्यांचा आकृतिबंध तयार करण्यास सांगण्यात आले आहे. त्याला शासनाची मान्यता घ्यायची आहे. शासनाची मान्यता मिळाल्यानंतरच नोकरभरती करायची आहे. तोपर्यंत कोणत्याही प्रकारची नोकरभरती करायची नाही, असा आदेश काढण्यात आला आहे. साखर आयुक्तांना या निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यास सांगण्यात आले आहे.

राज्यात सध्या २४५ साखर कारखाने सुरू आहेत. त्यात १३८ सहकारी कारखान्यांचा व १०७ खासगी कारखान्यांचा समावेश आहे.



# प्लास्टिक पिशव्यांचे पुन्हा पीक!

**मुंबई-** प्लास्टिकबंदी लागू केल्याबद्दल मिळालेल्या गुणांमुळे केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत मोहिमेत मुंबई महापालिकेची कामगिरी उंचावली आहे. मात्र महापालिकेची ही प्लास्टिकबंदी अनेक बाबतीत केवळ कागदावरच असल्याचे दिसून येत आहे. दादर, भायखळा, बोरिवली, गोवंडी, मानखुर्द येथील मंडयांमध्ये केलेल्या पाहणीत प्लास्टिक पिशव्यांची बिनधास्त देवाणघेवाण सुरू असल्याचे दिसून आले. प्लास्टिकबंदी लागू झाल्यानंतर व पालिकेने दंडात्मक कारवाईचा बडगा उगारल्यानंतर बाजारातून बंदीयोग्य प्लास्टिकच्या वस्तू गायब झाल्या. इतकेच नव्हे तर ग्राहकांनीही प्लास्टिकच्या पिशव्यांना सोडचिठ्ठी देत कापडाच्या पिशव्यांचा वापर सुरू केला. दुकानदारांनी कापडी आणि कागदी पिशव्यांची विक्रीही सुरू केली. ग्राहकांकडून त्यांना चांगला प्रतिसाद मिळू लागला. मात्र पालिकेची कारवाई क्षीण झाली आणि दुकानदार, फेरीवाले, ग्राहकांच्या हातात पुन्हा प्लास्टिकच्या पिशव्या दिसू लागल्या. सुरुवातीला कारवाईच्या भीतीपोटी लपूनछपून पिशव्या दिल्या जात होत्या. मात्र आता त्यांचा उघडपणे वापर होऊ लागला आहे. तरीही मुंबईला स्वच्छ सर्वेक्षणाच्या २०१९-२०च्या दुसऱ्या तिमाहीत स्वच्छ शहरांच्या यादीत आठवे स्थान मिळाले. लवकरच स्वच्छ सर्वेक्षणाच्या वार्षिक आढाव्यासाठी दिल्लीहून पथक मुंबईत येत आहे. तेव्हा हे पथक मुंबईच्या बाजारपेठाही तपासणार का, अशा प्रश्न आहे.

# मरणोत्तर अवयवदानामध्ये मुंबईकर अग्रेसर

**मुंबई-** शहरात गेल्या वर्षभरात मरणोत्तर अवयवदानाने दोनशेचा आकडा पार केला आहे, तर गेल्या पाच वर्षांत प्रत्यारोपणासाठी प्राप्त होणाऱ्या अवयवांच्या प्रमाणात दुपटीहून अधिक वाढ झाली आहे. राज्यात सर्वाधिक मरणोत्तर अवयवदान मुंबईत झाले असून गेल्या वर्षांत ७९ दात्यांनी पुढाकार घेतला आहे.

शहरात कित्येक वर्षांपासून सुरू असलेल्या अवयवदानाच्या चळवळीला यश येत आहे. २०१५ साली अवयवदात्यांची संख्या ४२ होती. हा आलेख वाढत २०१९ मध्ये ७९ पर्यंत पोहचला आहे. गेल्या पाच वर्षांत एकूण २८७ दात्यांनी अवयवदान केले आहे. २०१५ साली १०९ अवयव प्रत्यारोपित केले होते. दरवर्षी यामध्ये वाढ होऊन गेल्या वर्षभरात प्रत्यारोपित केलेल्या अवयवांची संख्या २२२ वर गेली आहे. अवयव प्रत्यारोपणाच्या अत्याधुनिक सेवासुविधांच्या उपलब्धतेमुळे पाच वर्षांमध्ये हृदयप्रत्यारोपणाच्या संख्येत नोंद घेण्याइतपत वाढ झाली असून तीन वरून हे प्रमाण गेल्यावर्षी थेट २१ वर पोहचले आहे. फुफ्फुसाच्या प्रत्यारोपणामध्ये शून्यावरून दहापर्यंत शहराने प्रगती केली आहे. मूत्रपिंडांचे सर्वाधिक प्रत्यारोपण झाले आहे.

अवयवदानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन गेल्या काही वर्षांत नक्कीच बदलत आहे. उलट आता अनेक जणांना अवयवदान करण्याची इच्छा असते. अवयवदान केव्हा करता येते, व्यक्तीच्या मृत्यूनंतर कोणत्या



परिस्थितीमध्ये अवयवदान करणे शक्य आहे याबाबत मात्र अजूनही लोकांमध्ये अपुरी माहिती असल्याचे जाणवते. देहदान आणि अवयवदान याबाबतही लोकांमध्ये संभ्रम आहे. तेव्हा याविषयी योग्य माहिती पोहचविणे अधिक गरजेचे असल्याचे ‘दधिचि देहदान’ चळवळीचे बाळकृष्ण भागवत यांनी व्यक्त केले. गेल्या वर्षभरात शहराने चांगली प्रगती केली आहे. परंतु अजूनही मोठ्या प्रमाणात रुग्ण अवयव प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत आहेत. मुंबईतील पालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये गेल्या वर्षी एकच अवयवदान होऊ शकले आहे. तेव्हा सरकारी रुग्णालयांमध्ये सुविधा उपलब्ध करून अधिकाधिक अवयदानावर भर देणे पुढील लक्ष्य असल्याचे विभागीय अवयव प्रत्यारोपण समन्वय समितीचे अध्यक्ष डॉ. एस.के. माथूर यांनी सांगितले.

# रस्त्यांची कामे रखडणार?

**मुंबई-** रस्त्यांच्या कामांच्या निविदा प्रक्रियेत या वर्षी मुंबई महापालिका प्रशासनाने घातलेल्या नवीन अटीमुळे हिवाळा सरत आला तरी कंत्राटदारच निश्चित न झाल्याने या आर्थिक वर्षांत रस्त्यांची कामे वर्षभरापासून रखडली असल्याचा आरोप भाजपचे नगरसेवक प्रभाकर शिंदे यांनी केला. तर पालिकेच्या इतिहासात प्रथमच मुंबईकरांना या वर्षी एकही नवा रस्ता मिळणार नसल्याचा



रस्त्यांची कामे लांबण्याची शक्यता आहे. नवीन अटीमुळे कंत्राटदारांनी जादा दराने बोली लावली आहेत. त्यामुळे ही सगळी निविदा प्रक्रिया रद्द करून नव्याने निविदा प्रक्रिया राबवण्याचा पालिका प्रशासनाचा विचार आहे. मात्र तसे झाल्यास रस्त्याच्या कामाचे प्रत्यक्ष कार्यादेश देण्यास तीन-चार महिन्यांचा अवधी लागू शकतो. दरवर्षी ऑक्टोबरमध्ये रस्त्याच्या नवीन कामांना तसेच विकासकामांना सुरुवात होते. मात्र यंदा जानेवारी उजाडला तरी रस्त्यांच्या कामांना सुरुवात झालेली नाही. निविदा प्रक्रियेत नवीन अट घातल्यामुळे तब्बल साडेआठशे कोटींची रस्त्यांची कामे रखडली आहेत. विविध विभागांतील २००० कोटींची कामे रखडल्याचा आरोप स्थायी समितीमध्ये समाजवादी पक्षाचे गटनेते रईस शेख यांनी केला. पूर्व-पश्चिम उपनगरातील आरोप विरोधी पक्षनेते रवी राजा यांनी केला. पालिकेच्या वतीने या वर्षी ८६२ कोटींच्या रस्त्यांच्या कामांच्या निविदा मागवण्यात आल्या. यामध्ये ६०० कोटी रुपये काँक्रीटीकरणासाठी तर २३३ कोटी रुपये डांबरी रस्त्यांसाठी आहेत. मात्र पालिका प्रशासनाने या वेळी नवीन अट घातली आहे. त्यानुसार रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर कंत्राटदाराला केवळ ६० टक्के रक्कम द्यायची व त्यानंतर हमी कालावधीपर्यंत उर्वरित ४० टक्के रक्कम टप्प्याटप्प्याने देण्याचे ठरवण्यात आले आहे. या अटीमुळे कंत्राटदारांनी यंदा २० ते ४५ टक्के अधिक दराने बोली लावली आहे. त्यामुळे ३०० कोटींचा अतिरिक्त भार पालिकेवर पडणार आहे. या पेचावर प्रशासनाने अद्याप तोडगा न काढल्यामुळे रस्त्यांच्या कामांचे कार्यादेश दिलेले नाहीत.

# बेस्टच्या तिजोरीत १२ कोटींची नाणी

**मुंबई-** भाडेकपात केल्यानंतर बेस्टकडे सुट्या पैशांचा ढीगच लागला आहे. बेस्टकडे १२ कोटी रुपयांची नाणी जमा झाली आहेत. जमा झालेले सुटे पैसे नेण्यासाठी कंत्राट दिलेल्या कंपनीने ती नेण्यास टाळाटाळ केल्याने बेस्ट उपक्रमासमोर मोठा पेच निर्माण झाला आहे.

बेस्टने भाडेकपात केल्यानंतर प्रवासी संख्या वाढत गेली. तुलनेने महसुलात मात्र फारशी वाढ नाही. यात ५ किलोमीटरसाठी पाच रुपये भाडे केल्याने सुट्या पैशांची मोठी भर पडत गेली. १ जानेवारी २०२० ला बेस्टच्या सर्व आगारांत मिळून ११ कोटी ५० लाखांची सुटी नाणी जमा झाली. तर गुरुवार, शुक्रवारी आणखी ४० लाख रुपयांच्या नाण्यांची भर पडली. त्यामुळे एकूण सुट्या पैशांचा आकडा १२ कोटींपर्यंत पोहोचला. यासंदर्भात शुक्रवारी बेस्ट समितीच्या झालेल्या बैठकीत सदस्य श्रीकांत कवठणकर यांनी सुट्या पैशांचा मुद्दा उपस्थित केला.



रोज दीड कोटी रुपयांची चिल्लर जमा होत आहे. आगारात जमा झालेली चिल्लर व रक्कम नेण्याचे काम एका कंपनीकडे असून रोजची मोठ्या प्रमाणात असलेली सुटी नाणी नेण्यास मात्र नकार दिला आहे. कंपनी २००, ५०० आणि २००० च्या नोटा स्वीकारते. तसेच ५ व १० रुपयांची ८० टक्के नाणी स्वीकारत असून १ व २ रुपयांच्या चिल्लरचे करायचे काय असा सवाल संबंधित अधिकाऱ्यांना पडल्याचे कवठणकर म्हणाले. त्यामुळे बेस्टला दिवसाला व्याजापोटी मिळणाऱ्या ३१ हजार रुपयांवरही पाणी सोडावे लागत असून त्यावर तोडगा काढण्याची मागणी त्यांनी केली.

बेस्ट महाव्यवस्थापक डॉ. सुरेंद्र कुमार बागडे यांनी बस भाडे कमी झाल्यापासून नाण्यांची समस्या वाढली आहे. रिझर्व बँक ऑफ इंडियासोबत बोलणी सुरू आहेत. याशिवाय नाणी नेण्याचे काम दिलेल्या कंपनीला आदेश देऊन लवकरच त्यावर तोडगा काढण्यात येईल असेही स्पष्ट केले.

# टीव्ही मनोरंजन अधिक स्वस्त

**मुंबई-** गेल्यावर्षी दूरसंचार नियामक प्राधिकरणाने (ट्राय) डीटीएच आणि केबलधारकांसाठी नवीन दरप्रणाली लागू केली होती, मात्र त्यानंतर टीव्ही पाहण्यासाठी अधिक पैसे मोजावे लागत असल्याच्या तक्रारी ग्राहकांनी केल्या होत्या. या तक्रारी विचारात घेत ट्रायने ग्राहक आणि ब्रॉडकास्टर्स दोघांनाही फायदेशीर ठरावे यासाठी पुन्हा एकदा डीटीएच आणि केबलधारक यांच्यासाठी नवीन नियम लागू केले आहेत. नवीन नियमानुसार ग्राहकांना द्याव्या लागणाऱ्या नेटवर्क कॅपेसिटी फेअरमध्ये (एनसीएफ) १३० रुपयांत २०० वाहिन्या पाहता येणार आहेत. केबलधारक आणि डीटीएच ऑपरेटर्स यांच्यासाठी १५ जानेवारीपासून तर ग्राहकांसाठी १५ मार्चपासून या नव्या नियमांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

नव्या नियमाचा फायदा असला तरी याच नियमानुसार ब्रॉडकास्टर्सना वाहिन्यांचे दर बदलता येणार आहेत. वाहिन्यांचे पॅकेज (झी, सोनी, स्टार समूह) देताना १२ रुपयांपेक्षा जास्त मूल्य असलेल्या वाहिन्या पॅकेजमध्ये समाविष्ट करता येणार नाहीत, असे ट्रायने ब्रॉडकास्टर्सना स्पष्ट केले आहे.

पृष्ठ १ वरुन

## दिल्ली आपचीच

असलेल्या भाजपाला केवळ ८ जागांवर समाधान मानावे लागेल, असा अंदाज या ओपिनियन पोलमधून वर्तवण्यात आला आहे. गेल्या निवडणुकीत भोपळाही फोडता न आलेल्या काँग्रेसला यावेळी काहीसा दिलासा मिळणार असून, काँग्रेसला ३ जागा मिळतील, असा अंदाज या ओपिनियन पोलमध्ये वर्तवला आहे.

मतदानाच्या टक्केवारीचा विचार केल्यास आम आदमी पक्षाला ५३ टक्के, भाजपाला २६ टक्के आणि काँग्रेसला ५ टक्के मते मिळतील. तर १६ टक्के मते इतर पक्षांच्या खात्यात जातील, असे एबीपी न्यूज-सी व्होटरच्या ओपिनियन पोलमध्ये म्हटले आहे.

२०१५ मध्ये झालेल्या दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीत अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाने ६७ जागा जिंकत निर्विवाद विजय मिळवला होता. भाजपाला केवळ ३ जागांवर समाधान मानावे लागले होते. तर काँग्रेसला भोपळाही फोडता आलेला नव्हता.

दरम्यान, २०१९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने आप आणि काँग्रेसला मात देत दिल्लीतील सात पैकी सात जागांवर कमळ फुलवले होते. त्यावेळी ७० पैकी ६५ विधानसभा मतदारसंघात भाजपाला आघाडी मिळाली होती. तर काँग्रेसला ५ मतदारसंघात आघाडी मिळाली होती. तर आपला एकाही मतदार संघात आघाडी मिळाली नव्हती. मात्र दिल्लीतील मतदारांचा लोकसभा आणि विधानसभा निवडणुकी वेगवेगळा कौल देण्याचा कल पाहता दिल्लीतील राजकीय समीकरण गुंतागुंतीचे बनलेले आहे.

पुढील महिन्यात होणाऱ्या दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीचे बिगुल अखेर आज वाजले. आज दुपारी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेमध्ये निवडणूक आयोगाने दिल्ली विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. ७० सदस्यसंख्या असलेल्या दिल्ली विधानसभेसाठी ८ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून, ११ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे. मुख्य मुख्य निवडणूक आयुक्त सुनील अरोडा यांनी निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक आयोगाने निवडणुकीची तारीख जाहीर केल्यापासून दिल्लीत आचारसंहिता लागू झाली आहे.

## ऑस्ट्रेलियातील आगीत अनेक संसार उध्वस्त

ऑस्ट्रेलियात जंगलात लागलेल्या आगीने आतापर्यंत २३ जणांचा बळी घेतला आहे. या संकटाचा सामना करण्यासाठी ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान स्कॉट मॉरिसन यांनी शनिवारी ३ हजार रिजर्व्ह सैनिकांना बोलावून घेतले आहे. या आगीत जवळपास ५० कोटी प्राणी अन् पक्षांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. त्यामध्ये हजारो कोआला प्राण्यांचा समावेश आहे. युनिव्हर्सिटी ऑफ सिडनीच्या इकोलॉजिस्ट यांच्या संशोधनानुसार या आगीत ४८० मिलियन्स म्हणजेच जवळपास ४८ कोटी प्राणी अन् पक्षांचा जीव गेला आहे. दक्षिण गोलार्धातील सूर्याच्या प्रवेशाने ऑस्ट्रेलियातील जंगलात आगीच हंगाम सुरू झाला असून यामध्ये मोठ्या प्रमाणात वन्यजीवांचा जीव गेलाय.

अमेरिकेच्या दृष्टीने विचार केला तर त्यांनी सुमारे ५०० अमेरिकी सैनिकांच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या व्यक्तीचा काटा काढला आहे. इराणच्या दृष्टीने ज्याच्या नावाने शत्रू थरथर कापत असे असा एक बहाद्दर जनरल त्यांनी गमावला आहे... आणि जगाच्या दृष्टीने पाहिले तर ज्यात बरेच काही जळून खाक होऊ शकते अशी आग लावणारी ही घटना आहे. इराण ही घटना सहजपणे पचवू शकणार नाही, हे नक्कीच. म्हणूनच इराणने अमेरिकेचा सूड उगविण्याची धमकी दिली आहे!

इराणच्या रेव्होल्युशनरी गाडर्स या सैन्यदलांमध्ये प्रतिष्ठित ‘कुद्स फोर्स’ या प्रतिष्ठित विशेष विभागाचे प्रमुख मेजर जनरल कासिम सुलेमानी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खमेनाई यांच्या थेट आदेशावरून काम करायचे आणि इराणमध्ये ते खमेनाई यांच्यानंतरचे सर्वात शक्तिशाली मानले जायचे. म्हणून सुलेमानी यांच्या मृत्यूनंतर इराणने त्यांना ‘अमर शहिदा’चा दर्जा देऊन तीन दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला. त्याचबरोबर अमेरिकेने सुलेमानी यांच्या हत्येची किंमत मोजायला तयार राहावे, असा इशाराही इराणने दिला.

## प्रभाग अध्यक्षानी पकडले भेसळयुक्त अंड्यांचे ट्रक

यांना येथील अंड्याच्या दुकानात खरेदी करताना तफावत आढळली. त्यामध्ये अंड्याला कोणत्या प्रकारचा उग्र वास येत नव्हता. तसेच त्यामध्ये प्लॅस्टिकसारखा तरल पदार्थ आढळला. सदर माहिती मिळताच संध्या दोशी व त्यांचे पती विपुल दोशी यांनी शिवसैनिकासोबत दोन्ही टेम्पो मधील अंडी ताब्यात घेत चारकोप पोलीस ठाण्यात धाव घेतली. सुरुवातीला पोलीस याप्रकरणी तक्रार दाखल करून घेत होते. मात्र संध्या दोशी यांनी अन्न व औषध संचालनालयाचच्या आयुक्त पल्लवी दराडे यांचे संपर्क साधून यांच्याकडे याबाबत तक्रार केली. त्यानंतर विभागाचे दोन अधिकारी घटनास्थळी दाखल झाले.

## जेएनयूमधील हिंसाचार पाहून २६/११ मुंबई हल्ल्याची आठवण झाली – उद्धव ठाकरे

टाळत आपल्याला राजकारण करायचं नसल्याचं सांगितलं आहे. पोलिसांच्या कारवाईसंबधी बोलताना जर पोलिसांनी योग्य कारवाई केली नाही तर त्यांच्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण होईल असं म्हटलं. तसंच निष्पक्षपातीपणे चौकशी करणं गरजेचं असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं आहे. गरज वाटल्यास राज्यातील विद्यार्थ्यांची सुरक्षा वाढवू असं आश्वासन उद्धव ठाकरेंनी दिलं आहे.

# संपादकीय...

## ध्येय-उद्दिष्टापासून दूर चाललेली आजची पत्रकारिता



संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक


पूर्वीची ध्येयवादी पत्रकारिता आज राहिलेली नाही, हे वृत्तपत्रातील लेखनातून सहजी दिसून येते. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात या वृत्तपत्रांचे फार मोलाचे स्थान आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, गोपाळ गणेश आगरकर, महात्मा जोतिबा फुले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, नाटय़ाचार्य कृ. प्र. खाडिलकर अशा अनेक मंडळींनी ब्रिटिशांच्या विरोधात जनजागृती करण्यासाठी वृत्तपत्रांचा खूप चांगल्या प्रकारे वापर करून घेतला. त्यावेळचे या पत्रकार नेत्यांचे लेख वाचण्यासाठी वृत्तपत्रांवर वाचकांच्या उडय़ा पडत. संपादक हा वृत्तपत्राचा कणा असतो. वृत्तपत्रात येणा-या सर्व प्रकारच्या मजकुराला हाच जबाबदार असतो. त्याच्या लेखनामध्ये समाजमन बदलण्याची शक्ती असते.

स्वातंत्र्यानंतर १९७० पर्यंतचा भारतीय पत्रकारितेचा काळ हा विकसनशील पत्रकारितेचा काळ मानला जातो. प्रसिद्धीची, छपाईची साधने नसताना, वितरण व्यवस्था नसतानाही त्या काळी जास्तीत-जास्त वाचकांपर्यंत वर्तमानपत्र पोहोचवण्याची संपादकांची सतत धडपड असे. कार्यकर्ते हेच संपादक असल्याने समाजाचे वास्तव चित्र वृत्तपत्रात पाहायला मिळे. वृत्तपत्रावर वाचकांचा खूप विश्वास होता. वृत्तपत्रात बातमी आली म्हणजे, ती शंभर टक्के खरी असणारच अशी श्रद्धा समाजात होती. वृत्तपत्रात व्यक्तीचे नाव प्रसिद्ध होणे हे समाजात फार मोठे अप्रूप होते, छायाचित्रासाठी शिष्याचे ब्लॉक बनवावे लागत. ते काम खर्चिक असल्याने वृत्तपत्रात फोटो फार कमी प्रसिद्ध होत. त्यामुळे पाने भरण्यासाठी मजकुराला अधिक स्थान मिळे. त्यामुळे विविध लेखन प्रकाराचा, शुद्धलेखनावर अधिक लक्ष असलेला, दर्जेदार मजकूर देण्याची संपादकांची धडपड चाले. वृत्तपत्रात लेखन करणा-यांना समाजात अधिक मान असे. वृत्तपत्र हे एक ध्येय म्हणून चालवले जात असे. आज ही परिस्थिती राहिलेली नाही. आज वृत्तपत्र हे एक धंदा म्हणून चालवले जाते. त्यात काही चुकीचे आहे, असे म्हणता येणार नाही. कारण, वृत्तपत्रातून काही उत्पन्न मिळाले नाही, तर वृत्तपत्राचा खर्च कसा भागवायचा? कर्मचा-यांचे पगार कोठून द्यायचे, असा प्रश्न निर्माण केला जातो. त्यालाही काही मर्यादा असतात. पूर्वी त्या होत्या.

आता ती परिस्थिती राहिलेली नाही. पत्रकारितेच्या क्षेत्रात आमूलाग्र असे बदल झाले आहेत. या व्यवसायाकडे अलीकडे फक्त अर्थार्जन म्हणूनच पहिले जात असल्याने नीतिमत्ता राहिलेली नाही. विश्वासाऱ्हता संपुष्टात आली. या सर्वातून 'पाकीट पत्रकारिता' निर्माण झाली. जाहिराती मिळवण्यासाठी भल्या-बु-या मार्गाचे लेखन सुरू झाले. निवडणुका किंवा मोठे कार्यक्रम यांच्या बातम्यांना काही प्रमाणात पीतपत्रकारितेचे स्वरूप प्राप्त झाले. निवडणुकीच्या काळात तर काही राजकीय पक्षांनीच बांधून घेऊन त्यांच्या प्रचाराचे काम घेतले. यामुळे राजकीय स्वरूपाचे वास्तव चित्र वाचकाला मिळेनासे झाले. यातून वृत्तपत्रांची म्हणण्यापेक्षा त्यांच्या मालकांची आर्थिक बाजू भक्कम होऊन संपादकांचे लेखन, विचार स्वातंत्र्य संपुष्टात आले. ते सांगकामे बनले. या सर्व परिस्थितीने वृत्तपत्रापासून दर्दी, वाचनाची आवड असणारा जिज्ञासू वाचक दूर झाला. इंग्रजी वृत्तपत्रे त्यामानाने आज बरी निघतात. पण, मराठी वृत्तपत्रांचे दिवस मात्र खराबच म्हटले पाहिजेत. संपादकांना पूर्वीसारखे लेखन स्वातंत्र्य नाहीच. पण, मालकांनी दिलेले जाहिरातीचे 'टार्गेट' पूर्ण करावे लागते. त्यामुळे त्यांना स्वत:लाही नि:पक्षपातीपणे लेखन करता येत नाही. आपल्या वार्ताहरांची व्यावसायिक नीतिमत्ता जपणे कठीण जात आहे. जो जास्त जाहिराती आणतो, त्याला वृत्तपत्रात मानाचे स्थान मिळते. अनेक पुरस्कारांनी गौरवले जाते. पत्रकार म्हटला, तर किमान बातमी तरी समजली पाहिजे? लिहिण्याचे कसब सर्वानाच असते असे नाही, पण त्याने दिलेला मजकूर वाचकाला समजायला हवा. पूर्वी अनुभवातून पत्रकार-लेखक तयार होत.

मराठी पत्रकारितेत आजही अभ्यासू लोक आहेत, पण ते फक्त आपल्यापुरताच विचार करताना दिसतात. नव्या पिढीशी जवळीक साधण्याचा, त्यांना मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न करताना ते दिसत नाहीत. त्याचप्रमाणे नव्या पिढीलाही त्यांचे मार्गदर्शन घ्यावेसे वाटत नसल्याने, मीच श्रेष्ठ पत्रकार ही वृत्ती या क्षेत्रात वाढत आहे. यामुळे आज पत्रकारितेचे खच्चीकरण होत असून, वृत्तपत्रात किंवा वाहिन्यांत 'टोपल्या टाकू' पत्रकारांची संख्या वाढत आहे. पत्रकार संघटनातही राजकारण शिरलेले दिसते. उच्चपदे किती वर्षे आपल्याकडे ठेवता येतील, त्यातून व्यक्तिगत लाभ घेता येतील, यासाठी काही पत्रकारांची धडपड सुरू असलेली दिसते. त्यातून राजकीय नेते जरी केवळ एक गरज म्हणून पत्रकारांना जवळ करीत असले तरी, सामान्य वाचक मात्र पत्रकारापासून दूर होत असल्याचे चित्र सध्या पत्रकारितेत दिसत आहे.

# घाईचा रथ, अविचारांचे घोडे




**समाजमाध्यमाच्या क्रांतीमुळे राजकारण हा शब्द एवढा हलका झाला आहे की ते कोणी, किती आणि कशाचे करावे याला काही धरबंदच राहिलेला नाही. येत्या प्रजासत्ताक दिनी दिल्लीत राजपथावर होणार असलेल्या संचलनासाठी महाराष्ट्राचा चित्ररथ नाकारला गेल्यानंतर फेसबुक, ट्विटर आणि त्याचे प्रतिबिंब उमटून पाठोपाठ वृत्तवाहिन्यांवर तोच एक विषय सतत चर्चेत होता. अर्थातच दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रांमध्येही त्याची बातमी झाली.**

समाजमाध्यमांची उपयुक्तता आणि उपद्रवमूल्य या दोहोंचाही हल्ली विविध निमित्ताने प्रत्यय येतो आहे, दोहोंपैकी कशाचे पारडे जड आहे हे ठरवणेही अवघड होते आहे. समाजमाध्यमांना जणू चर्चेसाठीच्या मुद्द्यांचा भस्म्यारोग जडला आहे. चर्चेसाठी, वाद घालण्यासाठी अथवा हिरिरीने भांडण्यासाठी काही मुद्दा नसेल तर त्या दिवशी घडलेल्या एखाद्या क्षुल्लक घटनेचेही भांडवल केले जाते आणि ती घटना सूक्ष्मदर्शकाखाली धरली जाते. महाराष्ट्राचा चित्ररथ नाकारण्याबाबतही तेच घडले. राज्याचे मंत्रिमंडळ स्थापन होऊनही खातेवाटपाचा घोळ मात्र संपत नसल्याचे नसल्याचे वृत्त दाखवून वाहिन्यांना कंटाळा आला होता. त्यावर विनोद आणि कोट्या करून समाजमाध्यमेही दमली होती. चित्ररथाच्या बातमीने त्यांना हुरूप आला आणि जे प्रकरण एका बातमीवर संपले असते त्याची चोवीस तास धुनी पेटवण्यात आली. अर्धवट माहितीवर आधारित प्रतिक्रियांच्या अथवा वृथा अभिमानाच्या पोळ्या भाजल्या गेल्या. 'राजकीय' होऊ शकेल अथवा ज्यावर दोन तट पडू शकतील असा कोणताही मुद्दा आता गुंतवून ठेवू शकतो. ज्या राज्यांचे चित्ररथ नाकारण्यात आले त्यात महाराष्ट्र, पश्चिम बंगाल आणि केरळ ही तीन भाजपशासित राज्ये नसल्याने वादाला अधिकच झळाळी आली. महाराष्ट्रात अद्याप सत्तास्थापनेचे राजकीय नाट्य पूर्णतः शमलले नाही. माजी मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या टिपेच्या सुरातील भाषणांतून आणि त्यांच्या पत्नीने ट्विटरच्या माध्यमातून ते धुमसते ठेवले आहे. नव्या सत्ताधाऱ्यांकडेही जितेंद्र आव्हाड, संजय राऊत असे आवाजी फटाके आहेत, जे फार मागचा पुढचा विचार न करताच वादांच्या वाती पेटवतात. सुप्रिया सुळेंनाही ट्विटरवर व्यक्त होण्याची घाई असते. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार विलंबाच्या कारणास्तव महाराष्ट्राचा चित्ररथ नाकारला गेला असल्याचे सांगितले गेले आहे. त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना जबाबदार नेत्यांनी महाराष्ट्रावर अन्याय झाल्याची, द्वेषाचे राजकारण होत असल्याची प्रतिक्रिया देण्यापूर्वी किमान विलंबाचे कारण खरे आहे की खोटे आहे याची तरी शहानिशा करायला नको का? ममता बॅनर्जी या विचार न करता बोलण्याबाबत प्रसिद्धच आहेत, त्यांची गोष्ट वेगळी आहे.

किमान महाराष्ट्रातील नेत्यांनी तरी असा आक्रस्ताळेपणा करू नये. ज्या सहा राज्यांच्या चित्ररथांना परवानगी नाकारण्यात आली, त्यात भाजप सत्तेत सहभागी असलेल्या हरयाणा, बिहार या राज्यांचाही समावेश आहे. चित्ररथाचा सहभाग, त्याच्या विषयाची निवड, चित्ररथाचा आराखडा मंजूर करण्याची पद्धत, त्यासाठी विशेषज्ञ नेमण्याची प्रक्रिया याबाबत मार्गदर्शक तत्त्वे ठरलेली आहेत. त्या उपरही प्रत्यक्ष संचलनात चित्ररथांसाठी विशिष्ट कालावधी राखून ठेवलेला असतो, तेवढ्या वेळात किती चित्ररथांचा समावेश केला जाऊ शकतो, याचा विचार करुनच त्यांची संख्या ठरवली जाते. या आधीही तब्बल नऊवेळा महाराष्ट्राचा चित्ररथ नाकारला गेला आहे आणि त्यापैकी काही वेळा केंद्रात-राज्यात एकाच पक्षाची सरकारे होती. आजवरच्या प्रजासत्ताक दिन संचलनांचा इतिहास पाहिला तर महाराष्ट्राचा चित्ररथ सर्वाधिक वेळा पहिल्या क्रमांकाचा ठरलेला आहे. तेंव्हा चित्ररथाचा समावेश होणे अथवा न होणे हा आनंदाचा किंवा नैराश्याचा विषय होऊ शकतो, मात्र तो वादाचा आणि राजकीय आखाड्यात चर्चा करण्याचा विषय होऊ शकत नाही. परंतु याचे भान राजकीय पक्षांना राहिले नाही, नेत्यांनाही ते दाखवता आले नाही. राज्यात सरकार स्थापन झाल्याच्या पाचव्या-सहाव्याच दिवशीच 'ते जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यात अयशस्वी ठरले आहे' अशी टीका भाजपने करणे जेवढे अपरिपक्वपणाचे आहे तेवढीच चित्ररथाचा मुद्दा नाहक धोपटण्याची महाआघाडीतील नेत्यांची वृत्तीही बालीश आहे. नागरिकत्व कायदा आणि नागरिकत्व नोंदणीच्या विरोधाशी चित्ररथ नाकारण्याचा संबंध जोडणे हा याचा कळसच म्हणावा लागेल. घाईच्या रथाला, अविचारांचे घोडे जुंपून तात्कालिक विषयांवर चर्चांचा अकारण कीस पाडणाऱ्या सोशल मिडियाच्या आहारी जाणे राजकारण्यांनी टाळायला हवे. चर्चेत राहण्याचे सोपे मार्ग प्रत्यक्ष राजकारणात उपयोगाला येत नाहीत, याचा अनुभव संजय राऊतांना आताच आला आहे, त्यावरून तरी इतरांनी धडा घ्यावा.

# वसईत पोलीस आयुक्तालय होणारच, कायद्यात राहात तर फायद्यात राहाल!

**नालासोपारा :** लोकसंख्या वाढीचे प्रमाण आणि आपल्याकडे उपलब्ध असणारे पोलीस बळ याचा ताळमेळ बसविणे अवघड आहे. अशाही परिस्थितीत आपले अधिकारी व कर्मचारी आपला कारभार नीट सांभाळत आहेत. मात्र आता आपल्याकडे लवकरच पोलीस आयुक्तालय येत असल्याने आपले मनुष्यबळ व साधनसामग्री यात चांगली वाढ होणार आहे. त्यामुळे कायद्यात राहाल, तर फायद्यात राहाल. नागरिकांनी त्याबाबत निश्चिंत राहावे, असे आवाहन वसई विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक विजयकांत सागर यांनी वसई-नालासोपारा येथे केले.

पालघर पोलीस विभागाच्या 'रेझिंग डे सप्ताहा'चे गुरुवारी संध्याकाळी नालासोपारा पोलीस ठाण्यात उद्घाटन झाले. या प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी त्यांच्या समवेत विभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी पाटील (वसई), रेणुका बागडे (विरार), अमोल मांडवे (नालासोपारा) आणि त्या त्या विभागातील सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक उपस्थित होते. शहीद जवान संदीप सावंत व अर्जुन थापा यांना श्रद्धांजली व म. ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीस आदरांजली अर्पण करून या कार्यक्र माची सुरुवात झाली. आपल्या भाषणात अप्पर पोलीस अधीक्षक विजयकांत सागर पुढे म्हणाले की, हा सप्ताह विविध सत्रात विभागून होणार असून या निमित्ताने विद्यार्थी, युवक, युवती, महिला आणि ज्येष्ठ नागरिक या समाजगटांना समाविष्ट करण्यात आले आहे. या सर्वांना पोलिसांचे दैनंदिन कामकाज, शस्त्रे, नवे कायदे, स्वसंरक्षण, खबरदारी आणि न्याय्य हक्क यासंदर्भात योग्य ती माहिती दिली जाईल. सोबत जागृतीही केली जाईल. बेकायदेशीरपणे विदेशी नागरिक इकडे येतात, स्थिरावतात, वाहने घेतात आणि वर कायदा मानत नाहीत. अशांवर अधिक कठोर कारवाई केली जाणार आहे. आपणच अशांना अधिक मोबदला मिळतोय म्हणून घरे भाड्याने देत आहोत, छोटी-मोठी वाहने देत आहोत हे योग्य आहे का? आता परदेशी नागरिकांची माहिती लपविणाऱ्या वा आश्रय देणाड्या लोकांवर गुन्हे दाखल केले जात आहेत. या समस्या आपण सारे मिळून दूर करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. या वेळी इतर उपस्थित पोलीस उपअधीक्षकांची देखील समयोचित भाषणे झाली.

# वाशीत गांजा विकणारे चौघे जण अटकेत



**नवी मुंबई:** वाशी पोलिसांनी गांजा विकणाऱ्या चौकडीला जेरबंद केले असून त्यांच्या कडून १ लाख ३५ हजार रुपयांचा ११ किलो ३०० ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला आहे. तिघेही मुळचे बिहार येथील असून खास थर्टी फस्टला गांजा विक्री करण्यास आले होते.

राजीवकुमार राय (२२), नवलेशकुमार राय (२३), वाल्मिकी राय (२३) आणि दयानंद राय (२२) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नवे आहेत. हे चौघेही वाशीतील मिनी सी-शोअर येथे गांजा विक्री करण्यास आले होते. त्याबाबत माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय धुमाळ यांनी मिनी सी-शोअर येथे एक पथक पोलीस उपनिरीक्षक सचिन खोर्डे यांच्या नेतृत्वाखाली पाठवले. तपासात त्यांच्या कडे गांजा आढळून आला. विशेष म्हणजे त्यांच्या खिशात ३० डिसेंबरचे विशाखापट्टणम ते मुंबईचे रेल्वे तिकीट ही आढळून आले. त्यांची चौकशी केली असता केवळ गांजा विक्री करण्यास ते या ठिकाणी आल्याची कबुली त्यांनी दिली.

# मध्य रेल्वेच्या महिला प्रसाधनगृहांच्या स्वच्छतेची ऐशीतैशी

**ठाणे :** केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानात वरचा क्रमांक पटकावण्यासाठी सर्व सरकारी विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची लगबग सुरू असली तरी मध्य रेल्वेला मात्र, त्याच्याशी देणेघेणे नसावे. मध्य रेल्वे मार्गावरील ठाणे ते बदलापूर स्थानकांमधील महिला प्रसाधनगृहांची



दुरवस्था पाहिली की याचा अंदाज येतो.

नियमित सफाई न झाल्याने निर्माण झालेली दुर्गंधी, वीजबत्ती आणि पाणीपुरवठय़ाचा अभाव, साठून राहिलेला कचरा आणि बाहेर मुक्तपणे वाहणारे सांडपाणी अशी या स्थानकांतील प्रसाधनगृहांची अवस्था आहे. विशेष म्हणजे या प्रसाधनगृहांवर स्वच्छ भारत अभियानाचे पोस्टर मात्र झळकत आहेत. दरवर्षी स्वच्छ रेल्वे अभियानाअंतर्गत मध्य रेल्वे प्रशासन महिला प्रसाधनगृहांवर मोठय़ा प्रमाणावर निधी खर्च केरते. तरीही या प्रसाधनगृहांच्या स्वच्छतेचा दर्जा सुधारलेला नाही.

मध्यंतरी रेल्वे प्रवाशांनी केलेल्या आंदोलनादरम्यान महिला प्रसाधनगृहांच्या अस्वच्छतेचा मुद्दाही मांडण्यात आला होता. तेव्हा या स्वच्छतागृहांच्या देखभालीकडे विशेष लक्ष पुरवण्याचे आश्वासन रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आले होते. मात्र, ते आश्वासन हवेत विरले आहे. गेल्या वर्षी दिवा रेल्वे स्थानकात महिला प्रसाधनगृहांची संख्या अपुरी असल्याने एका महिलेला रेल्वे रुळांवर नैसर्गिक विधीसाठी जावे लागले होते. यावेळी महिलेला गाडीचा धक्का लागल्याने या महिलेला जीव गमवावा लागला होता. या घटनेनंतर खडबडून जागे झालेल्या रेल्वे प्रशासनाने स्थानकांच्या प्रसाधनगृहांची पाहणी केली होती. मात्र, काही दिवस केवळ कागदी घोडे नाचवत जुन्या प्रसाधनगृहांची स्वच्छता आणि नव्या प्रसाधनगृहांची बांधणी, अशी काही आश्वासने रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली होती. मात्र ती सर्व आश्वासने फोल ठरली आहेत.

# तीन कोटीची वीजचोरी पकडली



**डोंबिवली :** 'महावितरण'च्या कल्याण परिमंडळात वीजचोरांविरुद्ध सुरू असलेली मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे. नवीन वर्षाच्या पहिल्या तीन दिवसांत ९८३ वीजचोरांवर कारवाई करून जवळपास ५० लाख युनिटची वीजचोरी पकडल्याची माहिती कल्याण परिमंडळाचे मुख्य अभियंता दिनेश अग्रवाल यांनी शनिवारी प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिली.

कल्याण परिमंडळ कार्यालयाने डोंबिवली, कल्याण, बदलापूर, मुरबाड, शहापूर, उल्हासनगर, अंबरनाथ, वसई-विरार, नालासोपारा, वाडा, आचोळे, बोईसर, डहाणू, पालघर, जव्हार, मोखाडा, सफाळे, तलासरी, विक्रमगड या भागांत महिनाभरापासून वीजचोरांविरुद्ध मोहीम उघडली होती.

या मोहिमेत बुधवारी १५७, गुरुवारी ३८८ तर शुक्रवारी ४३८ जणांकडे सुरू असलेली ५० लाख युनिटची वीजचोरी उघडकीस आणण्यात आली. त्यातील ८७४ वीजचोरांविरुद्ध वीज कायद्यांतर्गत, १०९ जणांविरुद्ध अन्य कलमांन्वये कारवाई करण्यात आली. मीटरशी छेडछाड किंवा मीटर बायपास करणे तसेच वीजतारांवर थेट आकडे टाकून वीजचोरी असे प्रकार आढळून आले आहेत.

अचूक बिल मिळावे, यासाठी मीटर बदलण्याची कार्यवाही सुरू आहे. नवीन वर्षाच्या पहिल्या तीन दिवसांत ४५०० सिंगल फेज मीटर बदलण्यात आले आहेत. तर, आणखी ४५ हजार मीटर बदलण्याचे काम वेगाने सुरू आहे. तसेच एप्रिलपासून कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित केलेल्या ग्राहकांपैकी १०१७ ग्राहक विजेचा चोरटा वापर करीत असल्याचे आढळले असून त्यांच्याविरुद्ध कारवाई केली आहे. विजेचा अनधिकृतवापर टाळावा, असे आवाहन अग्रवाल यांनी केले आहे. अधीक्षक अभियंता धर्मराज पेठकर, सुनील काकडे, अशोक होलमुखे (प्रभारी), किरण नगावकर यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई सुरू आहे.

# पोलिसांनाच दोष नको नागरिकांनीही सजग असावे!

- ***दोन बंगल्यांमधील रोख रक्कम आणि दागिन्यांची लूट***
- ***कायदा-सुव्यवस्थेवर वसईकरांचा सूर; भुईगावमधील घटनेचे पडसाद***



नाताळच्या रात्री भुईगाव येथे झालेल्या घरफोडीमुळे वसईतील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. वसई-विरार भागात वारंवार अशा प्रकारच्या घटना घडू लागल्यामुळे एकीकडे पोलीस यंत्रणेवर टीका होत असतानाच केवळ पोलिसांनाच दोष न देता काही बाबतीत नागरिकांनीही सावधगिरी बाळगण्याची गरज व्यक्त होत आहे.

नाताळ सणाच्या पूर्वसंध्येला २४ डिसेंबरच्या मध्यरात्री वसईच्या पश्चिम पट्टय़ात नाताळचा जल्लोष असतानाच घरातील माणसे सहकुटुंब चर्चमध्ये प्रार्थनेकरिता गेल्याचा फायदा घेऊन अज्ञात चोरटय़ांनी निर्मळ येथील दोन बंगल्यांमधील रोख रक्कम आणि दागिन्यांची लूट केली. निर्मळ येथील घरफोडीच्या घटनेनंतर ज्येष्ठ समाजवादी नेते मनवेल तुस्कानो यांनी घटनास्थळाला भेट दिली आणि नालासोपारा पोलीस ठाण्यात जाऊन तपासाची माहिती घेतली असता या पोलीस ठाण्यात मंजूर पोलीस बळाच्या तुलनेत तुटपूंजे पोलीस उपलब्ध असल्याची माहिती मिळाली. पोलिसांवर टीका करताना पोलीस कोणत्या स्थितीत काम करत आहेत, याचाही विचार व्हायला हवा, असे मत यासंदर्भात तुस्कानो यांनी व्यक्त केले. आताच्या घडीला वसई-विरार भागाची लोकसंख्या सुमारे २५ लाखांच्या पलीकडे गेली आहे. सर्वत्र पोलिसांचा खडा पहारा ठेवणे शक्य नाही. त्यामुळे नागरिकांनीही स्वत:ची जबाबदारी जाणून काही सावधगिरीचे उपाय योजावयास हवे', असे मत हरित वसई संरक्षण समितीचे अध्यक्ष मार्कुस डाबरे यांनी व्यक्त केले आहे. बँकांमध्ये लॉकरची सुविधा आहे. रोकड, दागिने किंवा काही महत्त्वाची कागदपत्रे लॉकरमध्ये ठेवता येतात. मात्र वर्षाकाठी बँकेला भाडे द्यावे लागते. म्हणून काहीजण लॉकरच्या सुविधेचा लाभ घेण्याचे मुद्दाम टाळतात. त्यानंतर घरात चोरी झाली की कायदा-सुव्यवस्थेच्या नावाने ठणाणा करत बसतात. सोन्याची साखळी चोरून, घर फोडून विनासायास पैसा मिळत असेल तर चोरांचा सुळसुळाट होणारच. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने सावध राहणे गरजेचे आहे', असेही डाबरे म्हणाले.

**वसईकरांचा पोलीस ठाण्यावर मोर्चा**

दरम्यान, नाताळच्या पूर्वसंध्येला निर्मळ परिसरातील दोन बंगल्यांमध्ये घरफोडी करून लाखो रुपयांचा ऐवज लुटणाऱ्या गुन्हेगारांचा पोलिसांना अद्यपही मागमूस लागलेला नाही, यासह वसई-विरारमध्ये वाढत असलेल्या गुन्हेगारी घटनांच्या वाढत्या प्रमाणाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी वसईतील विविध सामाजिक संघटना येत्या पुढील शनिवारी ११ जानेवारी नालासोपारा पोलीस ठाण्यावर मोर्चा नेणार आहेत.

# १५० रेल्वेचे तिकिट खासगी कंपन्या ठरवणार

**नवी दिल्ली:** देशातील रेल्वेचे खासगीकरण करण्याच्या दिशेने आणखी एक पाऊल पडलं आहे. भारतीय रेल्वेने १०० रेल्वे मार्गांची पाहणी केली असून या मार्गावर लवकरच १५० खासगी रेल्वे धावणार आहेत. इतकच नव्हे तर या रेल्वेत किती तिकिट आकारायचे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर दिली आहे. मुंबई-कोलकाता, मुंबई-चेन्नई, नवी दिल्ली-मुंबई, तिरुवनंतपूरम-गुवाहाटी, नवी दिल्ली-कोलकाता, नवी दिल्ली-बेंगळुरू, नवी दिल्ली-चेन्नई, कोलकाता-चेन्नई. चेन्नई-जोधपूर या मार्गांचा समावेश आहे.



याचा अधिकार खासगी कंपन्यांना असणार आहे. खासगी कंपन्यांना बाजार भावानुसार प्रवाशांकडून तिकिट वसूल करण्याची मुभा मिळणार आहे.

भारतीय रेल्वे व नीती आयोगाच्या खासगी ऑपरेटर्सकडून १०० रेल्वे मार्गावर १५० खासगी रेल्वे धावण्याला परवानगी मिळाल्यानंतर रोडमॅप तयार करण्यात आला आहे. यासंदर्भात एक डिस्कशन पेपरही आणण्यात आला आहे. खासगी रेल्वेतून २२ हजार ४०० कोटी रुपयांची गुंतवणूक येऊ शकते, असा अंदाज वर्तवला आहे. अर्थ मंत्रालयाने १९ डिसेंबर रोजी पब्लिक प्रायव्हेट अप्रेजल कमिटी (इईईंण) कडून दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे. देशभरात १०० रेल्वे मार्गावर १५० खासगी रेल्वे धावणार असून यासाठी लांब पल्ल्याच्या गाड्यांची निवड केली आहे, अशी माहिती रेल्वेच्या तसेच, या प्रमुख मार्गांपैकी मुंबई-वाराणसी, मुंबई-लखनऊ, मुंबई-नागपूर, नागपूर-पुणे, सिंकदराबाद-विशाखापट्टणम, पाटणा-बेंगळुरू, पुणे-पाटणा, चेन्नई-कोईबंतूर, चेन्नई-सिंकदराबाद, सूरत-वाराणसी, भुवनेश्वर-कोलकाताचा समावेश आहे. नवी दिल्ली हून पाटणा, अलाहाबाद, अमृतसर, चंदीगड, कटरा, गोरखपूर, छपरा व भागलपूरचा समावेश आहे. १०० मार्गांपैकी नवी दिल्लीहून ३५, मुंबईतून २६, कोलकाताहून १२, चेन्नईहून ११ आणि बेंगळूरूहून ८ मार्ग कनेक्ट होणार आहेत. हे सर्व शहर महानगर आहेत. अन्य काही महानगर नसलेल्या शहरातही हे रेल्वेमार्ग जोडण्याचा विचार सुरू आहे. यात गोरखपूर-लखनऊ, कोटा-जयपूर, चंदीगड-लखनऊ, विशाखापट्टणम-तिरुपती आणि नागपूर-पुणे या शहराचा समावेश आहे.

# १५ लाख दिले नाही: मोदी, शहा, आठवलेंविरोधात खटला दाखल

**रांची-** लोकसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनानुसार १५ लाख रुपये दिले नाहीत म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्याविरोधात रांचीच्या कनिष्ठ न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे. या तिघांवरही जनतेची फसवणूक आणि दिशाभूल केल्याचा आरोप करण्यात आला आहे. झारखंड उच्च न्यायालयाचे वकील आणि डोरंड येथील रहिवासी हरेंद्र कुमार सिंह यांनी हा खटला दाखल केला आहे. त्यावर न्यायिक दंडाधिकारी अजय कुमार गुडिया यांच्यासमोर सुनावणी झाली. याप्रकरणावर आता १ फेब्रुवारी सुनावणी होणार आहे. २०१४च्या लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी परदेशातून काळा



पैसा आणून सर्व भारतीयांच्या खात्यात १५-१५ लाख रुपये देणअयाची घोषणा केली होती. त्याशिवाय प्रत्येक वर्षी तीन लाख नोकऱ्या देण्याचं आश्वासनही त्यांनी दिलं होतं. भाजपच्या निवडणूक घोषणापत्रातही त्याचा उल्लेख होता, असं या याचिकेत म्हटलं आहे. मोदींनी ७ नोव्हेंबर २०१३मध्ये छत्तीसगड येथे हे आश्वासन दिलं होतं. लोकांची फसवणूक करून त्यांनी बहुमत मिळवलं होतं. भाजपचे अध्यक्ष अमित शहा यांनीही हेच आश्वासन दिलं होतं. त्यानंतर त्यांनी ५ फेब्रुवारी २०१५ रोजी शहा यांनी वृत्तवाहिन्यांशी बोलताना हा चुनावी जुमला होता आणि केवळ निवडणुकीत बोलायचं म्हणून ही घोषणा केली होती, अशी कबुली दिली होती. त्यासाठी तक्रारदाराने २१ डिसेंबर २०१९ रोजी अमित शहा यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीचा हवालाही दिला आहे. रिपाइं नेते आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवलेंवरही असाच आरोप करण्यात आला आहे. आठवले यांनी १८ डिसेंबर २०१८ रोजी महाराष्ट्रातील सांगलीमध्ये जनतेशी संवाद साधताना काळापैसा आल्यावर लोकांना १५-१५ लाख रुपये मिळतील असं आश्वासन दिलं होतं. त्यामुळे त्यांनीही जनतेची फसवणूक केली असल्याचं या तक्रारीत म्हटलं आहे. दरम्यान, तक्रारदाराने पंतप्रधान कार्यालयाकडे माहितीच्या अधिकारातून जनतेच्या बँक खात्यात १५-१५ लाख रुपये कधी येणार? असा सवाल केला होता. त्यावर हा प्रश्न आरटीआयच्या कक्षेत येत नसल्याचं उत्तर पंतप्रधान कार्यालयाकडून देण्यात आलं होतं.

# ग्राहकांना डिजिटल पेमेंटची सेवा दिली नाही तर व्यापाऱ्यांना रु ५००० दंड

## सेवा न देणाऱ्या दुकानदारांवर संक्रांत; दर दिवसाला ५ हजारांचा दंड

**नवी दिल्ली : नरेंद्र मोदी सरकारने डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्यासाठी गेल्या तीन वर्षांपासून कंबर कसली आहे. आज छोट्या छोट्या नाश्ता, दुकानांमध्येही भीम, गुगल पे, पेटीएमचे बारकोड लागलेले दिसतात. मात्र, तरीही काही दुकानदार असे आहेत की त्यांना कॅशच लागते. अशा दुकानदार, व्यापाऱ्यांवर आता संक्रांत ओढवणार आहे. केंद्र सरकार सक्तीचे पाऊल उचलणार असून ३१ जानेवारीनंतर दिवसाला ५००० रुपयांचा दंड वसूल करणार आहे.**

आजही अनेक ठिकाणी रोखीने व्यवहार केले जातात. डिजिटल पेमेंट सक्तीचे नसून एखाद्या ग्राहकाला जर ते करायचे असेल तर त्याला ती सुविधा देणे केंद्राने बंधनकारक केले आहे. छोटे व्यापारी यामध्ये पुढे आहेत. पण ज्यांची वर्षाची उलाढाल ५० कोटी किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा व्यापाऱ्यांनी याकडे कानाडोळा केला आहे. अशा व्यापाऱ्यांकडून सरकार १ फेब्रुवारीपासून दर दिवसाला ५ हजार रुपयांचा दंड वसूल करणार आहे.

सीबीडीटीने सांगितले की, व्यापाऱ्यांना इलेक्ट्रॉनिक मोडमध्ये पैशांचे व्यवहार करण्यासाठी पुरेसा वेळ देण्यात आला आहे. जर या व्यापारी, दुकानदारांनी ३१ जानेवारी, २०२० पर्यंत डिजिटल पेमेंट सुविधा सुरू केली तर त्याला दंड द्यावा लागणार नाही. पण जर ही सुविधा सुरू केली नाही तर प्रतिदिन पाच हजार रुपयांचा दंड आकारला जाणार आहे. नुकतेच सरकारने एमडीआर शुल्क रद्द केले आहे. यामुळे व्यापाऱ्यांना यापुढे हे शुल्क द्यावे लागणार नाही. या आधी काही व्यापारी, हॉटेल व्यावसायिकांकडून २ टक्के जादा आकारले जात होते. ही वसुली ग्राहकांकडूनच केली जात होती.



# 'आम्ही ऐकलंय की राहुल गांधी समलैंगिक आहेत'

**नवी दिल्ली-** काँग्रेसने सावकरांवर जे वादग्रस्त पुस्तक वितरीत केलंय त्यावरून देशभर वादळ निर्माण झालाय. भाजपने हा मुद्दा लावून धरला असून त्यावरून काँग्रेसवर हल्लाबोल केलाय. महाराष्ट्रात शिवसेनेचा मित्रपक्ष काँग्रेस असल्याने आता भाजप सेनेची कोंडी करण्याचाही प्रयत्न करतेय. मध्य प्रदेशात काँग्रेसने एका कार्यक्रमात सावरकरांबद्दल अतिशय आक्षेपार्ह मजकूर असलेली पुस्तिका वितरीत केली होती. त्यानंतर हिंदूमहासभेच्या अध्यक्षांनी काँग्रेस सेवादलद्वारा मध्य प्रदेशात एका वादग्रस्त पुस्तिकेचे वितरण करण्यात आले होते. या पुस्तिकेवरून आता नव्या वादाला तोंड फुटले आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा मारेकरी नथ्थूराम गोडसे आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यात समलैंगिक संबंध असल्याचा दावा या पुस्तिकेत करण्यात आला आहे. यावरून भाजपसह शिवसेनेनेही काँग्रेसवर हल्लाबोल केला आहे.



आता या वादाला वेगळं वळण मिळालंय. अखिल भारतीय हिंदू महासेभेचे अध्यक्ष स्वामी चक्रपाणी यांनी यावरून थेट काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्यावर शरसंधान केलंय. ते म्हणाले, सावरकरांवर काँग्रेसने अतिशय घाणेरडा आरोप केलाय. आम्ही पण असं ऐकतोय की काँग्रेसचे नेते राहुल गांधी हे समलैंगिक आहेत म्हणून. चक्रपाणी यांच्या या टीकेने हा वाद आणखी चिघळण्याची शक्यता आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबाबत अतिशय घाणेरडे लिखाण असलेली पुस्तिका काँग्रेस पक्षाने वितरित करून आपल्या विकृत मानसिकतेचे दर्शन घडवले असल्याची टीका विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. ही त्या पक्षाची बौद्धिक आणि मानसिक दिवाळखोरी आहे. या अशा दिवाळखोर पक्षाशी अनैसर्गिक आघाडी केलेली शिवसेना तीव्र निषेध नोंदवून या पुस्तकावर महाराष्ट्रात बंदी घालणार, की केवळ सत्तेसाठी आपल्या आराध्यांचे असे अपमान वारंवार सहन करणार असा सवाल देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.देवेंद्र फडणवीस म्हणाले, भारतीय जनता पक्ष या पुस्तकाचा तीव्र निषेध करते.

# ॲक्सिस बँकेतील खाती स्टेट बँकेमध्ये वळवणार

राज्यातील पोलिसांची वेतन खाती ॲक्सिस बँकेकडे वर्ग करण्याचा फडणवीस सरकारचा निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे बदलणार असल्याचे वृत्त आहे. साधारण दोन लाख पोलीस कर्मचाऱ्यांची वेतन खाती ॲक्सिस बँकेतून पुन्हा स्टेट बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीय बँकेत वर्ग करणत येतील, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. हा निर्णय झाल्यास ॲक्सिस बँकेचे मोठे नुकसान होणार आहे.



राज्यातील पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची वेतन खाती ॲक्सिस बँकेत वर्ग करण्याचा निर्णय फडणवीस सरकारने घेतला होता. यावरून फडणवीस यांच्यावर अनेकदा आरोप झाले होते. फडणवीस यांनी पदाचा दुरुपयोग केल्याचा आरोप करतानाच, त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधकांनी त्यावेळी केली होती. त्यावर २००५ सालीच पोलिसांची वेतन खाती ही ॲक्सिस बँकेत वर्ग करण्याचा निर्णय झाला होता, असा दावा त्यावेळी फडणवीस यांनी केला होता. मात्र, तो दावा खोटा आहे. त्यावेळच्या शासननिर्णयात ही खाती एकट्या ॲक्सिस बँकेत वर्ग करण्यात यावीत, असे म्हटले नव्हते. मात्र, २०१७मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आदेशाने पोलीस मुख्यालयातून परिपत्रक काढून पोलिसांचे पगार ॲक्सिस बँकेतून करण्याचा निर्णय झाल्याचा आरोप नाना पटोले यांनी केला होता.

फडणवीस यांच्या पत्नी ॲक्सिस बँकेत नोकरीला आहेत. पाच वर्षांत फडणवीस यांनी पदाचा दुरुपयोग करून ॲक्सिस बँकेला मदत केली का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला होता.

# कचरामुक्तीसाठी आराखडा करा -उद्धव ठाकरे

**मुंबई-** कचरामुक्त शहरांसाठी घनकचरा व्यवस्थापनचा राज्याचा विस्तृत प्रकल्प आराखडा तयार करावा, अशा सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शुक्रवारी येथे दिल्या. स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्ये महाराष्ट्रातील शहरे अव्वल येण्यासाठी छोट्या शहरांबरोबरच मोठ्या शहरांनीही एकसंघ काम करावे, अशी सूचनाही त्यांनी केली. स्वच्छ सर्वेक्षण २०२० च्या अनुषगांने ठाकरे यांनी राज्यातील महापालिका आयुक्त व नगरपालिकांचे मुख्याधिकारी यांच्याशी आज व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला. या वेळी नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री अनिल परब, मंत्री आदित्य ठाकरे उपस्थित होते. नगरविकास विभागाच्या प्रधान सचिव मनीषा म्हैसकर यांनी सादरीकरणाद्वारे स्वच्छ महाराष्ट्र अभियानात आत्तापर्यंत केलेल्या कामाचा आढावा सादर केला. मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यातील शहरे स्वच्छतेत अग्रेसर राहण्यासाठी सर्वेक्षणात राज्यातील जास्तीत जास्त शहरांना पहिल्या दहामध्ये मानाकंन मिळण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करावे लागणार आहे. त्यासाठी प्रत्येक अधिकाऱ्याने सामान्य नागरिक म्हणून आपल्या शहरांकडे पाहणे आवश्यक आहे. त्यातून



नागरिकांना काय हवे हे कळण्यास मदत होते. शहरे ही देशाचा चेहरा असल्यामुळे येथील रस्ते, पदपथ, मैदाने, रुग्णालये स्वच्छ व सुंदर रहावीत, यासाठी प्रयत्न व्हावेत. नागरिकांना आनंददायी वाटावे, आपली शहरे पाहण्यासाठी परदेशी पर्यटक यावेत, अशी ती असावीत. त्यासाठी कामांचे प्राधान्यक्रम ठरवावे असा मनोदय व्यक्त केला. कचरामुक्तीसाठी एकत्रित आराखडा तयार करावा. यामध्ये कचरा प्रक्रिया प्रकल्प, या प्रकल्पाच्या ठिकाणी हरित पट्टा, कचरा विलगीकरण आदींचा समावेश असावा.

# गुजरातेत १५ हजार आयुष्मान कार्ड रद्द, पाच लाख रुपयांपर्यंत मोफत उपचाराच्या योजनेत घोटाळ्याच्या वृत्तानंतर कारवाई

**अहमदाबाद–** जगातील सर्वात मोठ्या आयुष्मान भारत आरोग्य योजनेतील घोटाळ्याच्या वृत्तानंतर गुजरात सरकारने शुक्रवारी कारवाई केली. सरकारने बनावटरीतीने बनवलेले १५ हजार आयुष्मान कार्ड रद्द केले आहेत. असे असले तरी अद्यापही ५ हजार बनावट कार्ड असल्याचा संशय आहे. गुजरातेत ३३ लाख कुटुंबातील सुमारे १.६५ कोटी लोकांकडे हे कार्ड उपलब्ध आहेत. गुजरात सरकारने हे प्रकार रोखण्यासाठी घोटाळा विरोधी पथक नेमण्याची घोषणा केली आहे. आरोग्य विभागाचे मुख्य सचिव जयंती राव यांनी सांगितले की, केंद्र सरकारच्या घोटाळा विरोधी पथकाचे प्रतिनिधी गुजरातेत आले होते. नोव्हेंबर २०१९ मध्ये कच्छच्या गांधीधाम आणि राजकोट येथे घोटाळ्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या संदर्भात वेगवेगळ्या जिल्ह्यात गुन्हेही दाखल आहेत. बनावट आयुष्मान कार्ड प्रकरणी आता फौजदारी गुन्हे दाखल केले जातील.

**घोटाळा नव्हे, लिपिकाची चूक -** छत्तीसगड मधील एका कुटुंबाच्या नावे १०९ कार्ड असल्याचे वृत्तही भास्करने दिले होते. त्या कुटुंबातील ५७ जणांनी आयुष्मान कार्डवर डोळ्यांच्या शस्त्रक्रिया केल्या आहेत. यावर छत्तीसगड सरकारने शुक्रवारी म्हटले की, असा घोटाळा झालेला नाही. एकाच कुटुंबाच्या नावे १०९ कार्ड लिपिकाच्या चुकीमुळे झाले आहेत.




अशी चूक अशक्य - केंद्र सरकार : दरम्यान, राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाने (एनएचए) शुक्रवारी सायंकाळी संपूर्ण घोटाळ्याचा सविस्तर अहवाल जारी केला. या अहवालात नमूद करण्यात आले आहे की, अशी चूक होणे केवळ अशक्य आहे. कारण डेटा प्रणाली स्वयंस्फूर्तीने एकाच कुटुंबाचे एवढ्या प्रमाणात कार्ड बनवू शकत नाही. कारण प्रत्येक कार्डची तपासणी अधिकारी करतात व मंजुरी देतात.

आयुष्मान भारत योजनेत सर्वात जास्त घोटाळे गुजरातमध्ये झाल्याचे वृत्त दैनिक भास्कर व दिव्य मराठीने शुक्रवारी (३ जानेवारी) रोजी प्रकाशित केले होते. गुजरातमध्ये एकाच कुटुंबाच्या नावे १७०० लोकांचे कार्ड बनवण्यात आले आहेत.

JET TECHNO SERVICES PVT LTD.
Email :jettechnoservices@gmail.com

Senior Citizen Social Rights Foundation
सिनिअर सिटीझन सोशल राईटस् फाऊंडेशन
Email : scsocialrightsfoundation@gmail.com • NITY AAYOG UNIQUE ID : MH/2019/0224064

R.N.I.no. MAHAR/2014/57121
मानवाधिकार बातमी
संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS

Annapurna Caterers
Udyog Aadhaar Number : MH33A0133630

R.N.I.no.MAHAR/2014/55402
महानगर समाचार
आपले स्वातंत्र आपले विचार
संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक
PRESS

अखिल भारतीय मानवाधिकार युनियन
संस्थापक
दिपक मोरेश्वर नाईक
9594418181 / 9594047474

SOCIAL RIGHTS FOUNDATION
(सोशल राईटस् फाऊंडेशन)

R.N.I. No. MAHMAR/2014/60133
पोलिस बातमी पत्र

आश्रय ट्रस्ट
सामाजिक • शैक्षणिक • सांस्कृतिक

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. २, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)